# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**मराठी विभाग**

सकाळ

मंगळवार, १६ ऑक्टोबर २०१८ | ४

## राजगुरुनगरला वाचन प्रेरणा दिन

**राजगुरुनगर, ता. १५ :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनानिमित्त ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यात विविध साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त आयोजित साहित्यिक उपक्रमांमध्ये 'मला भावलेले पुस्तक' या विषयावर आयोजित निबंधलेखन स्पर्धेत ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी लोकप्रिय कवितांचे सादरीकरण केले. 'मला प्रभावित करून गेलेला सिनेमा' या विषयावरील चर्चासत्रात जोगवा, सैराट, दंगल, तारे जमींपर, थ्री इडियटस, चक दे इंडिया आदी चित्रपटांसंदर्भात विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना वर्गात नटसम्राट नाटक दाखविण्यात आले. मराठीतील जुन्या म्हणी व वाक्प्रचारांचे संकलन विद्यार्थ्यांनी केले. डॉ. अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख या प्रेरणादायी पुस्तकाचे अभिवाचन विद्यार्थ्यांनी केले. 'वाचनसंस्कृतीची आवश्यकता' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

वाचनातला आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धी माणसाला जगण्यास पात्र बनवते, असे कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले. या वेळी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. ए. जी. कुलकर्णी, डॉ. बी. डी. अनुसे उपस्थित होते. कविता करणे, सुचणे हे तंत्र नाही तर कविता करण्यासाठी विचार करणे आणि तो मांडणे महत्त्वाचे असते, असे कुलकर्णी यांनी सांगितले. या उपक्रमात मयुरी लगाडे, हर्षदा शिंदे, निशिगंधा पवळे, ऋतुजा नाईकरे, प्रगती मांजरे, सुनील वायकर, धनंजय रौंधळ, प्राजक्ता मांजरे, प्रथमेश रामाणे, प्रियंका गायकवाड, प्रज्ञा तळेकर या विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

पुढारी | पुणे, रविवार १४ ऑक्टोबर २०१८

# राजगुरू महाविद्यालयात विविध उपक्रम

**राजगुरुनगर :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने ३ ते १३ ऑक्टोबरदरम्यान 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला. या काळात येथे विविध साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात 'मला भावलेले पुस्तक' या विषयावर निबंधलेखन स्पर्धा, कवितांचे सादरीकरण, 'मला प्रभावित करून गेलेला सिनेमा' या विषयावर चर्चासत्र, नटसम्राट नाटक वर्गात दाखविण्यात आले. मराठीतील जुन्या म्हणी व वाक्प्रचारांचे संकलन केले. डॉ. अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख या प्रेरणादायी पुस्तकाचे विद्यार्थ्यांनी अभिवाचन केले. 'वाचनसंस्कृतीची आवश्यकता' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन केले होते. यावेळी प्रथम वर्ष कला व वाणिज्य आणि द्वितीय व तृतीय वर्षातील मराठी विषयाचे विशेषस्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या प्रसंगी कला शाखेचे उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. ए. जी. कुलकर्णी, डॉ. बी. डी. अनुसे उपस्थित होते.

जनप्रवास | रविवार, दि. १४ ऑक्टोबर २०१८

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन



राजगुरुनगर । वार्ताहर

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दि. ३ ते १३ ऑक्टोबर दरम्यान भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना व विविध साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात प्रथम वर्ष कला व वाणिज्य आणि द्वितीय व तृतीय वर्षातील मराठी विषयाचे विशेषस्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या प्रसंगी कला शाखेचे उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.ए.जी.कुलकर्णी, डॉ.बी.डी.अनुसे उपस्थित होते.

या साहित्यिक उपक्रमांमध्ये मला भावलेले पुस्तक या विषयावर निबंधलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यात सुमारे ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी लोकप्रिय कवितांचे सादरीकरण करताना काव्यागायन केले. मला प्रभावित करून गेलेला सिनेमा या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्यात मराठीतील जोगवा, नटसम्राट, हिंदीतील दंगल, तारे जमीं पर, थ्री इडियट्स, चक दे इंडिया इ. चित्रपटांमधील विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. नटसम्राट नाटक विद्यार्थ्यांना वर्गात दाखविण्यात आले. मराठीतील जुन्या म्हणी व वाक्प्रचारांचे संकलनही विद्यार्थ्यांनी केले. डॉ.अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख या प्रेरणादायी पुस्तकाचे विद्यार्थ्यांनी अभिवाचन केले. यावेळी वाचनसंस्कृतीची आवश्यकता या विषयावर विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी डॉ. अब्दुल कलामांच्या विचारांचा प्रसार व्हावा, विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी या उद्देशाने वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. वाचनातून आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धी माणसाला जगण्यास पात्र बनवते असे ते म्हणाले. या प्रसंगी बोलताना इंग्रजी विभागप्रमुख प्रा.ए.जी.कुलकर्णी यांनी काव्य वाङ्मयप्रकाराबद्दल विद्यार्थ्यांशी चर्चा केली. कविता करणं, सुचणं हे तेव्हा नाही तर कविता करण्यासाठी विचार करणं आणि तो मांडणं महत्त्वाचं असतं असं सांगून त्यासाठी पुस्तकी अभ्यास करावा लागत नाही, तर ती देणगी असावी लागते असे ते म्हणाले. त्यांनी काही केशवसुत, बालकवी, बा.सी. मर्ढेकर, इंदिरा संत, बहिणाबाई चौधरी यांच्या कविता सादर केल्या. या उपक्रमात मधुरी लगाडे, हर्षदा शिंदे, निकिता पावळे, ऋतुजा नाईकरे, प्रगती वांजरे, सुनील पायघन, धनंजय शिंदे, प्राजक्ता वांजे, प्रथमेश गमाणे, दिग्विजय गायकवाड, प्रज्ञा तळेकर या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.संजय शिंदे यांनी तर आभार ऋषिकेश गरुड या विद्यार्थ्याने मानले.

केसरी पुणे, १४ ऑक्टोबर २०१८

# वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दि. ३ ते १३ ऑक्टोबर दरम्यान भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना व विविध साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात प्रथम वर्ष कला व वाणिज्य आणि द्वितीय व तृतीय वर्षातील मराठी विषयाचे विशेषस्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या प्रसंगी कला शाखेचे उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. ए. जी. कुलकर्णी, डॉ. बी. डी.अनुसे उपस्थित होते.



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना विद्यार्थी व प्राध्यापक वृंद.

या साहित्यिक उपक्रमांमध्ये मला भावलेले पुस्तक या विषयावर निबंधलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यात सुमारे ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी लोकप्रिय कवितांचे सादरीकरण करताना काव्यगायन केले. मला प्रभावित करून गेलेला सिनेमा या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्यात मराठीतील जोगवा, सैराटसह हिंदीतील दंगल, तारे जमीं पर, थ्री इडियट्स, चक दे इंडिया इ. चित्रपटांसदर्भात विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. नटसम्राट नाटक विद्यार्थ्यांना वर्गात दाखविण्यात आले. मराठीतील जुन्या म्हणी व वाक्प्रचारांचे संकलनही विद्यार्थ्यांनी केले. डॉ.अब्दुल कलाम यांच्या अग्निपंख या प्रेरणादायी पुस्तकाचे विद्यार्थ्यांनी अभिवाचन केले. यावेळी वाचनसंस्कृतीची आवश्यकता या विषयावर विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

कला शाखेचे उपप्राचार्य डॉ संजय शिंदे यांनी डॉ. अब्दुल कलामांच्या विचारांचा प्रसार व्हावा, विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी या उद्देशाने वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. वाचनातला आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृध्दी माणसाला जगण्यास पात्र बनवते असे ते म्हणाले. या प्रसंगी बोलताना इंग्रजी विभागप्रमुख प्रा.ए.जी.कुलकर्णी यांनी काव्य वाङ्मय प्रकाराबद्दल विद्यार्थ्यांशी चर्चा केली. कविता करणं, सुचणं हे तंत्र नाही तर कविता करण्यासाठी विचार करणं आणि तो मांडणं महत्वाचं असतं असं सांगून त्यासाठी पुस्तकी अभ्यास करावा लागत नाही, तर ती देणगी असावी लागते असे ते म्हणाले. त्यांनी कवी केशवसुत, बालकवी, बा.सी. मर्ढेकर, इंदिरा संत, बहिनाबाई चौधरी यांच्या कविता सादर केल्या.

या उपक्रमात मयुरी लगाडे, हर्षदा शिंदे निशिगंधा पवळे, ऋतुजा नाईकरे, प्रगती मांजरे, सुनील वायकर, धनंजय रौंधळ, प्राजक्ता मांजरे, प्रथमेश रामाणे, प्रियंका गायकवाड, प्रज्ञा तळेकर या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.संजय शिंदे यांनी तर आभार ऋषिकेश गरुड या विद्यार्थ्याने मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख